विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक १४१ / २०१९

नवीन घरगुती वीज जोडणीस झालेल्या विलंबाबाबत

संतोष गुणाजी मालप ..... अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, चिपळूण (महावितरण) ..... प्रतिवादी

उपस्थिती

अपिलार्थीतर्फे :- संतोष गुणाजी मालप

प्रतिवादीतर्फे :- १. प्रकाश स. जमदाडे, कार्यकारी अभियंता, चिपळूण
२. प्रकाश बी देवके, उपकार्यकारी अभियंता, सावर्डे

कोरम : दिपक लाड

आदेश पारीत दिनांक :- १६ ऑगष्ट २०१९

आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ (यापुढे ज्याचा उल्लेख "ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६" असा केला जाईल) मधील विनियम १७.२ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण कोकण परिमंडळ (यापुढे ज्याचा उल्लेख "मंच" असा केला जाईल) यांच्या दिनांक २७ मार्च २०१९ च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थी ग्राहकाने सदरचे अभिवेदन दिनांक १६ जुलै २०१९ रोजी दाखल केलेले आहे.

२. मंचाने दिनांक १९ जुलै २०१९ रोजी एकमताने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आला.

"१) तक्रार अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदार यांना प्रस्तूत प्रकरणी झालेल्या मानसीक त्रासापोटी व पाठपुरावा करण्याकरीता झालेला प्रवास खर्च व टंकलेखन इ. इतर अनुषंगिक खर्चापोटी रू. एक हजार विरुध्द पक्षकार यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदार यांना रोख स्वरूपात अदा करावे. "

३. मंचाच्या आदेशाने समाधान न झाल्याने, अपिलार्थी ग्राहकाने अभिवेदनात नमुद केले की, अपिलार्थी हे घर क्र. ५६५, कामथे बुद्रुक, तालुका - चिपळूण, जिल्हा - रत्नागिरी येथे राहात असुन त्यांनी महावितरण उपविभागीय सावर्डे कार्यालयाकडे घरगुती नवीन वीज जोडणीसाठी फेब्रुवारी २०१८ रोजी अर्ज केला. त्याठिकाणी गंगाराम महादेव जावळे यांच्या नावे घरगुती वीज जोडणी होती. सदर जागेच्या मालकी हक्क कागदपत्रांमध्ये अपिलार्थीचे नाव आहे; शिवाय अस्तित्वात असलेल्या वीज जोडणी बाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास अपिलार्थी जबाबदार राहील हे सुध्दा अधिकाऱ्यांना कळविले. असे असुनही, प्रतिवादींनी अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही व दिनांक १ मे २०१८ रोजी मंजूरी नंतर रू.१०७७/- भरण्याची डिमांड नोट दिली. प्रतिवादीकडुन मंजूरीस झालेल्या दिरंगाईबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिले गेले नाही. तदनंतर दिनांक ३० ऑगष्ट २०१८ रोजी डिमांड नोटची रक्कम महावितरणकडे भरणा केली.

वेळेत वीज जोडणी मिळाली नाही म्हणून अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) दिनांक ५ डिसेंबर २०१८ रोजी अर्ज केला. कक्षाने दिनांक १३ मार्च २०१९ रोजीच्या आदेशात नमुद केले की, महावितरणने दिनांक ३१ जानेवारी २०१९ रोजी ग्राहकाला नवीन वीज जोडणी दिली. सबब, प्रकरण निकालात काढले. परंतू प्रत्यक्षात मीटर लावला नाही ही बाब कक्षाने लक्षात घेतली नाही.

संबधित अधिकारी यांनी दिनांक ३१ जानेवारी २०१९ रोजी लाईनमन यांच्याकडे वीज जोडणीसाठी मीटर दिले. मात्र लाईनमनने सदरचे मीटर मुद्दाम उशीराने दिनांक २३ मार्च २०१९

रोजी लावले. उपअभियंता व लाईनमन यांनी संगनमताने अपिलार्थीच्या घराची वीज जोडणी हेतुपुरस्कर उशीराने केली.

कक्षाच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून मंचाकडे दिनांक २७ मार्च २०१९ रोजी तक्रार दाखल केली. मंचाने मानसिक त्रासापोटी व पाठपुरावा करण्याकरीता झालेला प्रवास खर्च व टंकलेखन व इतर अनुषंगिक खर्चापोटी फक्त रू.एक हजार ची नुकसान भरपाई दिली. अपिलार्थीने आपल्या अभिवेदनात विनंती केली की, लाईनमन श्री. गजमल व त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी व आर्थिक नुकसान व मानसिक त्रासापोटी रू.१,००,०००/- मिळावेत.

४. प्रतिवादी महावितरण यांनी दिनांक ३० जुलै २०१९ च्या उत्तरात नमुद केले की, अपिलार्थी यांनी नवीन घरगुती वीज जोडणीसाठी दिनांक १ मे २०१८ रोजी अर्ज केला, त्यानुसार दिनांक ३० ऑगष्ट २०१८ रोजी रू.१०७७/- कोटेशनची रक्कम महावितरणकडे अदा केली. अपिलार्थी यांनी ज्या (घर क्र.५६५) ठिकाणी वीज कनेक्शनची मागणी केली होती तेथे गंगाराम महादेव जावळे यांच्या नावे अगोदरच वीज कनेक्शन होते व वीज वापराबाबत अपिलार्थी हे वीज देयकांचा नियमीत भरणा करत होते. त्यांचे या जागेवरून त्यावेळी वाद होते, त्यामुळे त्या वीज जोडणीच्या जागी दुसरी वीज जोडणी देणे चुकीचे होते. नंतर या संपूर्ण प्रकरणाची शहानिशा केल्यानंतर अपिलार्थीच्या नावाने दिनांक २७ मार्च २०१९ रोजी वीज जोडणी देण्यात आलेली आहे. या ठिकाणी विषेश करून नमुद करणे योग्य ठरेल की, अपिलार्थी हे वीज पुरवठया अभावी कधीही वंचीत नव्हते कारण पुर्वी असलेल्या वीज जोडणीवरून वीज पुरवठा सुरूच होता. मंचाकडे तक्रार दाखल केल्यानंतर मंचाने सुध्दा या सर्व बाबी तपासून आदेश दिला व या आदेशान्वये रू.एक हजाराची नुकसान भरपाई देण्याचे महावितरणला निर्देश दिले. सदरची नुकसान भरपाईची रक्कम दिनांक २५ जुन २०१९ रोजी अपिलार्थी यांना चेकने देऊन मंचाचे आदेशाचे पालन केलेले आहे. सबब, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

५. दिनांक ८ ऑगष्ट २०१९ रोजी सुनावणी व्हिडीओ कॉन्फरंस च्या माध्यमाने घेण्यात आली. सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अभिवेदनामध्ये नमुद केलेले मुद्दे पुनश्च मांडले. त्याचप्रमाणे त्यांनी असेही नमुद केले की, लाईनमन हे अत्यंत अरेरावी व उध्दटपणे अपिलार्थीशी बोलत असे. अपिलार्थी विषयी आकसापोटी प्रतिवादी यांनी लाईनमन यांच्याकडे दिनांक ३१ जानेवारी २०१९ रोजी मीटर दिल्यानंतरही सदर मीटर त्यांनी दिनांक २३ मार्च २०१९ रोजी लावले.

६. सुनावणी दरम्यान प्रतिवादी यांनी नमुद केले की, मंचाच्या आदेशाचे पालन करण्यात आले. अपिलार्थी यांना रू.एक हजाराची नुकसान भरपाई देण्यात आली. श्री.गजमल, लाईनमन यांची बदली सुध्दा करण्यात आली व नुकसान भरपाईची रक्कम अभियंता व लाईनमन यांच्याकडुन वसुल करण्यात आली. मंचाच्या आदेशाचे पालन झाले असल्यामुळे सदरचे अभिवेदन खारीज करण्यात यावे अशी विनंती प्रतिवादी यांनी केली.

निष्कर्ष व निर्णय

७. दोन्ही पक्षकारांचे म्हणने ऐकण्यात आले व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी यांना उशीराने वीज जोडणी मिळालेली आहे. या सर्व बाबींचा विचार करून, मंचाने आपल्या आदेशात नुकसान भरपाईपोटी रू.एक हजाराची रक्कम अपिलार्थी यांना दिली. सबब मंचाच्या आदेशात कुठलाही बदल करणे गरजेचे नाही.

८. अपिलार्थी यांचे अभिवेदन फेटाळण्यात येत आहे. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/-
(दिपक लाड)
विद्युत लोकपाल (मुंबई)

विद्युत लोकपाल म.वि.नि.आ.

खरी प्रत असल्याचे प्रमाणित
श्री. डी. एस. डुंबरे
सचिव